म. ग्रं. सं. ठाणे.
विषय ........ काव्य
सं. क्र. १९९२

# राम दर्शन

जगदीश खबूडकर



REFBK-0014792
REFBK-0014792

REFBK-0014792
REFBK-0014792



# रामदर्शन

जगदीश खेबूडकर

ठाणे
दा. क्र.

मूल्य
दीड रुपया



आचार्य अत्रे
यांच्या सदुसष्टाव्या
वाढदिवसानिमित्त प्रकाशित

•

प्रथमावृत्ति
१३ ऑगस्ट १९६५

•

(c) सौ. निरुपमा ज. खेबूडकर

•

प्रकाशक
चंद्रकांत शेटये
चंद्रकांत शेटये प्रकाशन मंदिर
शिवदर्शन, कोल्हापूर.

•

मुद्रक
सदाशिव माने
श्रीलक्ष्मी मुद्रणालय
कोल्हापूर.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रमांक २०००५० वि:
क्रमांक १६०२ नों दि: २८.१२.६५

माननीय सुधीर फडके यांना

प्रेमळ रसिका !

तुझ्या सेवेसाठींच तर ही सारी सिद्धता, हीं शब्दफुलें, हा स्वरगंध- या तालाक्षता आणि तुझ्या चरणीं लीन झालेली ही वेडी सद्भावना ! या भावनेनेच वाल्याचा वाल्मिकी झाला. या भावनेतूनच रामायणासारखें महाकाव्य जन्मले !

श्रीराम ! प्रेमाचे जणूं सरोवर ! त्यागाचा जणूं समुद्र ! कर्तव्याचा जणूं महासागर ! कोणीं किती गावें, कोणीं किती आळवावें ! अनंतापुढें अनंत शिणले. मीहि त्यातलाच एक. जसें दिसलें तसें वेंचलें !! कांही कळया, कांही फुलें, कांही पाकळया ओंजळींत घेतल्या. तुझ्या चरणकमलांवर वाहिल्या. फुलाला फूल भेटलें!...

रूप, रस आणि गंध यांची निवड तुझ्या हातीं ! सौंदर्याचा शोध तुझ्या दृष्टींत ! गुण असतील तर ती तुझी कृपा. दोष असतील तर ती माझी आगळीक. मात्र तुझ्या सेवेच्या संधीने माझें भाग्य उजळलें आहे. या जनता जनार्दनाच्या दर्शनाने धन्य धन्य झालों आहे मी, आणि म्हणूनच ज्या भावनेने लिहिलें त्याच भावनेने आस्वाद घेतला जावा, हीच एक तळमळीची इच्छा ! तुला नम्र प्रणाम.

– [signature]

जाणीव

●

या खंडकाव्याचा प्रयोग
करण्यापूर्वी मानधन रुपये
पंचवीस आगाऊ पाठवून
लेखी परवानगी घेणें
आवश्यक आहे. तसें न
केल्यास कायदेशीर
इलाज केला जाईल.

सौ. निरुपमा खेबूडकर
६३ बी, घाटी दरवाजा
कोल्हापूर क्रमांक २

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ४००७० ... दि: ...
क्रमांक ... नों दि: 26.12

॥ श्रीराम ॥

सुप्रसिद्ध कवि श्री. जगदीश खेबूडकर यांची एक स्वतंत्र काव्यशैली आहे. त्या शैलीमध्यें त्यांनीं "राम-दर्शन" द्वारा प्रभु रामचंद्राच्या जीवनाचें चांगलें दर्शन घडविलें आहे.

गीतरामायणानंतर रामचरित्रावर कोणीही काव्य रचिलें तरी त्याची तुलना गीतरामायणाबरोबर कर-ण्याचा मोह सर्वसाधारणपणें कुणालाही होईल. पण श्री. खेबूडकरांची स्वत:ची शैली ध्यानांत घेतली तर त्यांच्या काव्याचें योग्य तें मूल्यमापन होऊन त्याचा वेगळेपणा सहज सिद्ध होईल.

आपल्या देशाच्या सध्याच्या लाजिरवाण्या अवस्थे-मध्यें रामचंद्रासारख्या अलौकिक वीर पुरुषाचें चरित्र जितकें म्हणून आपणां सर्वांच्या कानांवर पडेल तितकें आवश्यक आहे. त्या दृष्टीनें श्री. खेबूडकरांनी जी राष्ट्रीय कामगिरी केली आहे त्यासाठीं माझे त्यांना धन्यवाद.

— सुधीर फडके

या निशा सर्वभूतानाम्, तस्याम् जागर्ति संयमी।
यस्याम् जागृति भूतानि, सा निशा पश्यतो मुनेः।।

परित्राणाय साधूनाम्, विनाशाय च दुष्कृताम्।
धर्मसंस्थापनार्थाय, संभवामि युगे युगे।।

( मातृदेवोभव ! पितृदेवोभव !! मातापिता हे आपले परमदैवत ! अशा आपल्या आंधळ्या आईवडिलांना कावडीत बसवून त्यांचा एकुलता एक लाडका श्रावणबाळ त्यांना काशीला घेऊन चालला आहे. डोंगर राने तुडवीत तुडवीत एका घोर अरण्यांत आला आहे. रखरखीत उन्हाची वेळ ! तहानेने जीव व्याकुळला आहे. श्रावणबाळ चाललाच आहे. )

## श्रावण बाळ

खांद्यावरती शतजन्माच्या घेउनि पुण्याईला,
काशिला श्रावणबाळ निघाला !
माय आंधळी, पिता आंधळा,
ग्रीष्म ओकितो अनलज्वाळा,
जलतृष्णेने, मायपित्यांचा, व्याकुळ जीव जहाला !
झाडाखालीं कावड ठेवी,
जलाशयामधि झारी बुडवी,
तोंच मागुनी, सूं सूं बोलत, बाण विषारी आला !
विव्हल होउन, अन् किंचाळुन,
क्षणांत पडला, भूवरि श्रावण,
त्वरें धांवला दशरथ राजा, शापित दुर्दैवाला !
कण्हत बोलला श्रावण त्याला,
' पाजवि रे जल मायपित्याला.'
डबडबलेल्या नयनीं बघुनी, सोडियले प्राणाला !
दशरथ घेई भरुनि झारी,
चाहुल येतां, माय विचारी,
'कां न बोलसी, कां रे रुससी, आम्हावरी लडिवाळा ?
दशरथ बोले, ' बाळ आपुला,
नकळत, माझ्या हातुनि वधिला,
दशरथ नोहे, पुत्र तुझा मी, क्षमा करीं बाळाला ! '
शब्द ऐकुनी झणीं नृपाचा,
क्रोध भडकला मायपित्यांचा,
' पुत्रवियोगें मरशिल' म्हणुनी, सोडिति इहलोकाला !

( ' पुत्र पुत्र करून मरण पावशील ! ' दशरथाला शाप मिळाला. बिचारा दशरथ ! संभ्रमात पडला ! मला पुत्रशोक ? आणि मी तर निपुत्रिक ! मग हा शाप कीं वरदान ? इकडे पुत्रलाभाचा आनंद आणि तिकडे पुत्रवियोगाचें दुःख ! जणूं ऊनसावलीचा खेळच ! एक डोळा हंसतो, एक डोळा रडतो, अशा अवस्थेत दशरथ राजा परत निघाला .....

## दुःखी दशरथ

अधोमुखाने आक्रमिता पथ,
फुलतो दशरथ, सुकतो दशरथ !

निपुत्रीक मी असता देवा
पुत्रशोक मज कैसा व्हावा,
होउनि विस्मित होउनि हळवा,
हळुहळु अपुला हाकारी रथ !

भाग्य कोरिले कसें ललाटीं,
पुत्रलाभ मज शोकासाठीं,
रचित मनोरा, उजव्या हातीं,
डाव्या हातीं भग्न मनोरथ !

काय अवस्था द्विधा मनाची,
बघे सावली वाट उन्हाची,
मीच जाहलो मृगया माझी,
लाभाआधी उपजे संकट !

दिवस रात्रिच्या सीमारेषा,
सांध्यछटा या देत प्रकाशा,
क्षणभर आशा आणि निराशा,
परस्परांना करिती सोबत !

वरदानासम शाप गमे हा,
घडो सांगता स्वप्नांची या,
क्षण सौख्याच्या सागरांत या,
चिरदुःखाचा बुडेल पर्वत !

( राजवाड्यांत जाताच घडलेली सारी हकीकत दशरथाने सर्वांना सांगितली. ऋषिमुनींच्या सांगण्यावरून व सर्वांच्या इच्छेनुसार पुत्रप्राप्तीसाठीं यज्ञ करण्याचे निश्चित ठरले. पुत्रकामेष्टियज्ञाची तयारी जोरात सुरू झाली. अयोध्या नगरीच्या आसमंतातून दाहीदिशांनी यज्ञसोहळा पाहण्यास जन-समुदाय लोटला. यज्ञ सुरू झाला...... )

# पुत्रकामेष्टि यज्ञ

शरयुतीरी आज ही कां, जाहली दाटी,
दशरथाचा यज्ञ चाले, पुत्रकामेष्टी !

ठाकले दाही दिशांनी, येउनी राजे किती,
सोडलेला अश्व विजयी, होउनी ये मागुती,
राजपत्नी यज्ञदीक्षा, घेत सांगाती !

चंदनासंगे घृताची, आहुती ही अर्पिता,
भडकल्या ज्वाला नभाला,लाल जिव्हा स्पर्शिता,
वेदमंत्राचा घुमवा, घोष हा ओठी !

येउनी ऋषिराज देती, दिव्य आशिर्वाद की,
दिव्य हस्ते हवन होई, कार्य लागो सार्थकी,
पूर्वपुण्याई उभी ही येउनी पाठी !

देवही आनंदले, आनंदल्या देवांगना,
वरदहस्ते दशरथाची, पूर्ण होवो कामना,
ईश्वरी सामर्थ्य धावे, मानवासाठीं !

यज्ञकुंडातून येई यज्ञपुरुषाची प्रभा,
पात्र हाती पायसाचे घेउनी राही उभा,
दान ते घेतां, फुलांची होतसे वृष्टी !

( यज्ञपुरुषाने पायसदान दिले. दशरथाच्या चित्तवृत्ती फुलून आल्या. तीनहि राण्यांचा आनंद गगनांत मावेना. तो दिव्यप्रसाद तीनहि राण्यांनी भक्षण केला. त्याच्या प्रभावाने तीनही राण्या गर्भवती झाल्या. सर्वांच्याच अंतःकरणांत अलौकिक सुखाची संवेदना निर्माण झाली. कांहीं दिवसानंतर त्यापैकीं कौशल्या राणीच्या पोटीं, चैत्र शुद्ध नवमी या दिवशीं माध्यान्ह कालीं प्रभु रामचंद्रांनी जन्म घेतला..... )

# रामजन्म

रविकिरणांचा, राजमुकुट जणु, घालुनि अपुल्या शिरी,
उगवला चंद्र रा ज मं दि री !
सावळ्या, जो जो जो जो करी !

चिमणे चिमणे रूप सावळे,
चिमणे अवयव चिमणे चाळे,
वलयांकित हे रूप आगळे,
पसरली दिव्य प्रभा अंबरी !

निळसर लोचन मृदुल पापणी,
हसतो किंचित ओठ दुमडुनी,
भाग्यवान या भाळावरुनी,
लहरते, कुरळ बटा साजिरी !

उभि कौसल्या त्याच्याजवळी,
नयनीं अपुला बाळ न्यहाळी,
शृंगारित त्या राजमहाली,
वर्षती वरुनी अ मृ त स रीं !

रत्नजडित हा हले पाळणा,
आंत खेळतो राजस राणा,
असंख्य भवती जमल्या ललना,
ढाळिती चवऱ्या अबदागिरी !

अनंतास या अ नं त ना वे,
अनाम याला कुणी म्हणावे,
नामकरण या कसे करावे,
कळस हा, आज बने पायरी !

' ( कलेकलेने चंद्र वाढू लागला. लुटूलुटूं रांगू लागला ! दुडूदुडूं धावू लागला ! बाळराजाना अंगण पुरेना झाले. बाललीला सुरू झाल्या. हे हवं, ते नको. ते हवं हे नको. एके दिवशी रात्री या बालचंद्रानं पूर्णचंद्राचा हट्ट धरला. पृथ्वीवरल्या चंद्राला आभाळीचा चंद्र हवा ! पण कसा द्यायचा ? बाळराजे हट्ट सोडीनात. बोबड्या बोबड्या शद्बांत त्यांनी रामठेका धरला..... )

# चंद्रहट्ट

आई मला आभाळिचा, चंद्र हवा ग,
चंद्र हवा चंद्र मला, चंद्र हवा ग !

गोल गोल वाटोळा, दिसे किती छान ग,
दुरुनिया फेकितो हा, किरणांचे बाण ग,
देवाजिच्या मंदिराचा शुभ्र दिवा ग !

निळया निळया पाण्यामधीं डुबूडुबू नाचतो,
बघूनिया माझ्याकडं, खुदूखुदू हासतो,
भोवताली चांदण्यांचा, फिरे थवा ग !

नको मला रोजचींच, जुनी जुनी खेळणीं,
दिपले ग डोळे माझे, त्याच्याकडे पाहुनीं,
चमचमत्या चांदीचा, चेंडू नवा ग !

गोरी गोरी रात्र जणू, चांदण्याच्या धारा,
चेंडुफळी खेळायाला, सवंगडी वारा,
घडोघडी वेड त्याचे, माझ्या जिवा ग !

कां ग तुम्हीं साऱ्याजणी, हासता आम्हाला,
पापा नाही देणार, आम्ही तुम्हाला,
म्हणू नका आला आला बागुलबुवा ग !

( एक ना दोन ! किती लीलांचे वर्णन करावे ! होता होता युवराजांचे विद्यार्जन सुरू झाले. चौदा विद्या आणि चौसष्ट कलांनी युक्त असा हा तेजस्वी राजकुमार सर्वांच्या कौतुकाचा विषय बनला. एके दिवशी विश्वामित्र ऋषी राजवाड्यात आले आणि त्यांनी यज्ञरक्षणासाठीं राम लक्ष्मण यांची मागणी केली. हे कोवळे बालवीर मुनिराजांबरोबर मार्ग आक्रमू लागले. वाटेत शबरी भिल्लीणीने त्यांचे स्वागत केले. पुढे जातां जातां श्रीरामांना एक भव्य शिळा दिसली. त्या शिळेला श्रीरामांचा चरणस्पर्श होतांच त्यांतून एका स्त्रीची मूर्ति प्रकट झाली. श्रीरामांच्या पायास वंदन करून ती स्त्री म्हणाली..... )

## अहिल्योद्धार

शापभ्रष्ट या जडदेहाला आज मिळाली गती,
मी अहिल्या भाग्यवती !

एकांती मी होते अबला,
पतिरूपाने इंद्र प्रकटला,
भेद न कळता दोघामधला,
बाहुपाशि त्या आवेगाने इंद्र मला ओढिती !

नाथ तोंच मज दारी दिसलें,
भयकंपित मी बोलु न शकले,
आग ओकिती दोन्ही डोळे,
परपुरुषाशी रतले म्हणुनी नाथ मला शापिती !

अहो नाथ मज स्वीकारा हो,
फसले मी मज क्षमा करा हो,
आर्तस्वरे मी फोडित टाहो,
तोच पतीने दुःशापाचे दान दिले हाती !

पतिव्रता मी ठरले पतिता,
चमत्कार हा क्षणांत घडतां,
शिळारूप ये बघतां बघतां,
युगें युगें मी पिचत राहिले, प्रभो तुझ्यासाठीं !

चरण लागले आज शिळेला,
पुनर्जन्म हा माझा झाला,
मज मुक्तीचा मार्ग मिळाला,
जन्मजन्म मी तुझ्या कृपेची गाईन रे आरती !

78602

( अहिल्येचा उद्धार करून राम लक्ष्मण व विश्वामित्र-ऋषी पुढे निघाले. आश्रमाजवळ येतांच राम लक्ष्मण धनुष्य-बाणासह सिद्ध झाले. यज्ञकार्यांत अडथळा आणणाऱ्या राक्षसां-बरोबर घनघोर युद्ध सुरू झाले. एकामागून एक अशा असंख्य राक्षसांचा रामानं संहार केला. संकटांतून मुक्त झालेल्या ऋषी-मुनींनी रामाला शुभाशिर्वाद दिले. सर्व ऋषीमुनींच्या मेळा-व्यासह ते पुढे चालले. वाटेत मिथिला आली. तेथे जनक राजाने सीतेचे स्वयंवर मांडले होते. मध्यभागी प्रचंड असे शिवधनुष्य ठेवले होते. जो धनुष्याला दोरी जोडील त्याच्या गळयांत वरमाला पडणार ! बडे बडे राजे महाराजे आले नि पराभूत होऊन परत गेले. आतां पुढे काय होणार ! इतक्यांत ऋषींना वंदन करून राम पुढे सरसावले—आणि मग......)

स्वयंवर ७०७५० वि: दा।दा
क्रमांक ९६८२ नोंद दि: २८.९२

स्तुतिसुमनांच्या वर्षावाने मंटप दुमदुमला,
जिंकियला, पण जिंकियला !

विराजती युवराज धुरंधर,
एक एक ये पुढती सत्वर,
हरले राजे, हरला रावण, राम उभा ठाकला !

शिवधनु हाती धरी सावळा,
आणि जोडिता प्रत्यंचेला,
कडकडुनी ते दुभंग होऊन, कोसळले धरणीला !

पराक्रमाचे होता दर्शन,
मनी जानकी जाई लाजुन,
कंठी त्याच्या निजभक्तीची अर्पियली वरमाला !

गळा घालिता हार फुलांचा,
जुळे योग हा स्वर्ग-धरेचा,
जणू नाचली मिथिला नगरी, बघुनी ही प्रभुलीला !

जिवाशिवाचे सजीव पुतळे,
उभे मधोमध सर्वा दिसले,
देव उतरले पृथ्वीवरती, पहावया सोहळा !

( सीतेचे स्वयंवर झाले. प्रभुरामचंद्र सीतेसह अयोध्येला आले. आनंदाने दाहिदिशा दुमदुमल्या. राम, लक्ष्मण, भरत आणि शत्रुघ्न यांच्यासह दशरथ राजा आनंदाने राज्य करूं लागला. राम हा ज्येष्ठ राजपुत्र ! त्याच्या हातांत राज्याची सर्व सूत्रें द्यावीत व आपला वृद्धापकाल ईश्वर चिंतनात सुखाने घालवावा म्हणून दशरथाने रामाला राज्याभिषेक करण्याचे ठरविले. या वार्तेने राजासह प्रजेलाहि आनंद झाला. पण हाय ! या आनंदाला दृष्ट लागली. कैकयीचा सवतीमत्सर जागा झाला. पूर्वी दशरथाने कैकयीला दोन वर दिले होते. ही संधी साधून आज तिने ते वर मागितले. कैकयीने हट्ट धरला– " माझ्या भरताला राज्य द्या आणि रामाला चौदा वर्षं वनवासांत पाठवा." अरेरे, कैकयी, काय केलेस तूं हे ? दशरथ राजा सात्विक संतापाने म्हणाला......)

## कैकयी-हट्ट

काळजाचे होय पाणी, काय वर हा मागसी,
कैकयी धिक्कार तूझा, राक्षसी तूं राक्षसी !

स्वार्थ घेवोनी उरी कां,
चालवीसी व्यर्थ हेका,
काय सत्वाच्या घरी हे, रूप नाचे तामसी !

मत्सराची आग पोटी,
अग्निकण हे फुलत ओठी,
जाळुनी वात्सल्य सारे, भाळि रक्षा लाविसी !

जाउ दे वनि राम माझा,
होउ दे भरतास राजा,
दुष्ट फासे टाकुनी, हा काय दावा साधिसी !

आत्मघाताचा जुगार
खेळता होईल हार,
पकडुनी लक्ष्मीस हाती, शारदेला त्यागिसी !

धन्य हे मातृत्व तूझे,
धन्य हे पत्नित्व तूझे,
स्वामिनी सिंहासनाची, जाहली वेडीपिशी !

( भावनेपेक्षा कर्तव्य श्रेष्ठ आहे असे म्हणतात. रामरायाने सुध्दा आपल्या मातापित्यावरील प्रेमासाठी कर्तव्याचे पालन केले. पतीवरील प्रेमासाठी सीतेने कर्तव्याचे पालन केले आणि बंधुप्रेमासाठी लक्ष्मणाने कर्तव्याचे पालन केले. आज्ञाधारक राम, पतिभक्त सीता आणि बंधुप्रिय लक्ष्मण असे तिघेजण सर्वांचा आनंदाने निरोप घेऊन राजवाड्याबाहेर पडले. राजा दशरथ आंतल्या आंत दुःखाने जळत होता. कौसल्या मातेची ममता आक्रोश करू लागली. राम म्हणजे अयोध्येचा जणु प्राण! दगडाफुलातील जणु चैतन्य! दासीपासून राणीपर्यंत आणि बाळापासून वृध्दापर्यंत सारेजण कळवळून रडू लागले. प्रसन्न मुद्रेने एक एक पाऊल टाकीत प्रभुरामचंद्र पुढेपुढे चालू लागले.... )

# रामवियोग

शोकाकुल नगरि उभी, ही अधोमुखाने,
रामचंद्र आज वनीं, चालले सुखाने !

खिन्न अयोध्यावासी, द्रुतफास स्तब्ध,
दाटुनिया हुंदक्यात, फुटति आर्त शब्द,
परोपरी विनवितात, रडत आर्जवाने !

चालतसे देव जणू, त्यजुनि मंदिरास,
पदोपदीं भक्तांच्या, करित सांत्वनास,
भोगावे कर्मभोग, वि श्व चा ल का ने !

छायेसम जानकि ही, जाय राघवाची,
मंद मंद पाउले, पडति लक्ष्मणाची,
अवघ्यांचे मुखमंडल, भिजत आसवाने !

वृक्षवल्लरींना कां, आवरे न शोक,
पशुपक्षी चरणावर, करति अश्रुसेक,
व्याकुळले जडचेतन, आज गहिवराने !

पिळवटून काय निघे, हृदय माउलीचे,
मूर्च्छा ये दशरथास, 'राम' वदत वाचे
जितेपणी मरणयोग, पाहिला जगाने !

( प्रभु रामचंद्र, जानकी आणि लक्ष्मण यांनी अयोध्या नगरी सोडली. वनेउपवने, नद्यानाले मागे टाकीत ते चित्रकूट पर्वताजवळ आले. राजवस्त्रांचा त्याग करून त्यांनी वल्कले धारण केली. कंदमूलफलाशन करीत ही तिघे वनविहार करू लागली. निसर्गराजाने लोकराजाचे स्वागत केले. वनराणीने लोकसम्राज्ञीचे स्वागत केले. चित्रकूट पर्वतावरील रम्य ठिकाण पाहून त्यांनी पर्णकुटी बांधली. पर्णकुटी? छे ! राजप्रासादच तो! सीतामाईच्या भावना फुलून आल्या तिने श्रीरामाना बोलूनहि दाखवले-कीं— )

# वनविहार

हीं पर्णगुंफा, भासे मनाला, प्रासादासम खरी,
मी तर इथली वनसुंदरी !

उंच भों व ती पर्वतराजी,
शांत निळे जल सरितेमाजी,
मेघांच्या या नौका डुलती, गगनाच्या सागरी !

वृक्षवल्लरींवरी विहंगम,
वनचर फिरती कसे मनोरम
फलपुष्पांचा सडा शिंपिती, येथे दिनशर्वरी !

गगनचुंबि या चित्रकुटावर
झुळझुळ वारा वाहे सुंदर,
लहर लहरता सुमगंधाची, झाले मी बावरी !

कुरवाळित ही मखमल हिरवी,
किरण तृणाचे कौतुक पुरवी,
सप्तरंग हे उधळित आली, अरुणछटा लाजरी !

इंद्रपुरीची जणु ही प्रतिमा,
उणे न कांही मज श्रीरामा,
राज्य आपुले वनवासाचे, सुख माझे सामोरी !

( रामप्रभूनी वनवासाचे राज्य सुखाने चालविले खरे, पण तिकडे मात्र सारी अयोध्या नगरी शोकसागरांत बुडाली. दशरथाने हाय खाल्ली. शापाने आपले कार्य साधले. "पुत्र पुत्र करून मरण पावशील!" राजा दशरथाने "राम राम" करीत प्राण सोडला. भरताला तर यातील काहीच माहिती नव्हती. तो मातुलगृहाहून आला. झाला प्रकार त्याने ओळखला. आपल्या स्वार्थी आईमुळेच हे दुःखाचे आकाश कोसळले आहे हे त्याला कळून चुकले. भावाभावांची, पितापुत्रांची, पतिपत्नीची ताटातूट करणाऱ्या आपल्या कैकयी मातेची त्याने निर्भत्सना केली. बंधुप्रेमाने वेडा होऊन तो रामाला परत आणण्यासाठी निघाला. रामाचे दर्शन होताच तो सद्‌गदित झाला. रामाच्या पायांना मिठी मारून तो म्हणाला..... )

# भरतभेट

फोडिते टाहो अयोध्या, येऊनी त्या शांतवा,
आंतड्याचा पीळ बोले, परत या हो राघवा !

शून्य तो प्रासाद तेथे राजवस्त्रे पोरकी,
वल्कले देहावरी कां, कंदमूले कां मुखी,
राजपुत्राच्या ललाटी, कोरिला वनवास हा !

आवरू आता कसा मी, लोचनींचा सागर,
घाव हा तटातुटीचा, भग्न माझे अंतर,
प्रेम हे कर्तव्य माझे, मार्ग त्याला दाखवा !

ओणवे होऊन त्याला, उठविती श्रीराघव,
मस्तकी कुरवाळिती अन् बोलती स्वरलाघव,
पूर्व कर्माची गती ही, पूर्व योगायोग हा !

'ऊठ, डोळे पूस वेड्या, दुःख हे व्हावे सुख,
आपुल्या त्यागात आहे, जीवनाचे सार्थक,
राज्यभोगाहून आहे वेगळा सुखभोग हा !'

घेऊनी हाती खडावा, धूळ भाळी लाविली,
भरत जाई मागुती, भारावलेल्या पावली,
भेट ही दोन्ही ध्रुवांची, काननी झाली पहा !

( देवस्वरूप रामचंद्र ! लक्ष्मण तर रामाचा बहिश्चर प्राण आणि त्यागिनी सीतामाई जणु राममूर्तीची छायाच ! इथे सुखाला काय कमी ! घोर अरण्याचे नंदनवन झाले. वनवासाचा राजविलास झाला. आनंदाचे झरे वाहू लागले. पर्णकुटीच्या भोंवती वृक्षवेली धुंद होऊन डोलू लागल्या. फळाफुलांना बहर आला. गोडसुगंध दाहीदिशातून दरवळू लागला. अनंत रंगांची अनंत फुले! किती तोडावीत आणि किती नको, असे झाले सीतामाईंना ! डोळ्यांनी टिपलेले सौंदर्य डोळे मिटून त्या अनुभवू लागल्या. त्यांनी क्षणभरच डोळे मिटले आणि उघडले. तोंच त्यांचे दूर लक्ष गेले. "अहाहा ! किती सुंदर हरीण! किती मनोहर! कसे करू या मृगराजाचे वर्णन!" सीतामाई आनंदित होऊन रामप्रभूना म्हणाल्या..... )

क्रमांक ....१५८२........ नोंद दि. ........
२८.१२.

दूर तिथे त्या हिरवळिवरती, मान मुरडुनी उभा,
कांचनमृग तो पहा राघवा, कांचनमृग तो पहा !

उन्हात त्याची चमके कांती, तप्त सुवर्णापरी
लाडिक त्याच्या हलचालीने, वेड लागते उरी,
त्याच्या ठायी खिळले लोचन, रूप तयाचे अहा !

तृणांकुराशी करुनी चाळा, बागडतो चहुकडे,
पळता पळता मधेंच थांबुन, बघतो मागेपुढे,
इंद्रपुरीच्या नंदनवनिचा, दूत कुणी हा महा !

मदनमनोहर मृगराजाने, मोहित केले जणू,
मनात माझ्या मधुर कल्पना, गोफ लागली विणू
असा पवित्रा घेउनि त्याच्या, मागावरती रहा !

मउ मउ याच्या मृगाजिनाची, ल्यावी मी कंचुकी,
घडता माझी आशापूर्ती, माझ्याहुन मी सुखी,
वल्कलधारी या सीतेची, एक आगळी स्पृहा !

विलंब कां हो करिता नाथा, आशंका येउनी,
जा जा वेगे त्याच्यामागुन धनुष्य सरसावुनी,
त्याच मृगाला घेउन नाथा परतुन यावे गृहा !

( " मला तो कांचनमृग हवा ! " सीतामाईंनी प्रेमळ हट्ट धरला. मृगाजिनाची कंचुकी सीतेने मागावी आणि रामांनी न द्यावी ? छे ! आणि मग धनुष्यबाण सरसावून रामचंद्र त्या कांचनमृगाच्या मागोमाग धावले; पण तो मायावी हरीण क्षणांत इथं तर क्षणांत तिथं जायचा ! शेवटी रामांनी त्याला गाठलंच आणि धनुष्याची दोरी कानापर्यंत ओढून बाण सोडला. सूं सूं करीत बाण त्या हरिणाच्या पोटांत घुसला आणि त्या हरिणाने टाहो फोडला..... )

# सीताहरण

'सीते धाव ! सीते धाव !
लक्ष्मणा, सोसु कसा मी घाव ?'

लक्ष्मण धावे शरासारखा,
द्वारापुढती मारुन रेखा,
दुष्ट रावणे तोच टाकिला, कपट नाटकी डाव !

अतिथी रूपे रावण येई,
भीक घालते सीतामाई,
मायावी त्या साधूपोटी, लपला दांभिक भाव !

सती जानकी रघुरायाची,
विशुद्ध मूर्ती सौंदर्याची,
रूप पाहुनी दैत्य हासला, मनात पापी हाव !

पाउल पुढती ये सीतेचे,
उल्लंघन हो मर्यादेचे,
ओढुनी नेई एका हाती, भयास नुरला ठाव !

तळमळली कळवळली सीता,
हाक मारिते श्रीरघुनाथा,
हाकेसरशी रामप्रभूनी, वनी घेतली धाव !

( बाण जिव्हारी लागला आणि त्या मायावी हरिणाचे खरे रूप प्रकट झाले. तो मारिच राक्षस होता. होते ते बऱ्याकरताच. राक्षसाचा नाश तर झाला. पण सीतामाईंची इच्छा पूर्ण नाही झाली ! म्हणून प्रभुरामचंद्रांनी तसाच दिसणारा एक सुंदर हरीण पाहिला आणि तो मारून ते परत फिरले. तोंच वाटेत लक्ष्मण ! राम शंकित झाले. लक्ष्मणासह ते पर्णकुटीकडे निघाले, आणि पाहतो तो काय ? जानकी...... सीते ऽऽ ..... कुठे आहेस तूं ? )

## सीताशोध

दिशादिशांनो सांगा मजला, बुडलो मी संदेही,
विदीर्ण अंतर, आता माझी, शोधु कुठे वैदेही ?

वृक्षवेलिंनो सांगा आता,
पर्णाश्रू हे काय ढाळता,
कुणी पाहिली माझी सीता, जाय कुण्या ठायी ?

पशुपक्ष्यांनो शपथ तुम्हाला,
कुणी पाहिले मम कांतेला,
सत्व लागले आज पणाला, बोलत कां नाही ?

मरणोन्मुख तूं सांग जटायू
कुठे मैथिली माझी पाहू,
मरुन अमर तूं वीर चिरायू, या भुवनी होई !

जलधारांनो, गिरिगुहरांनो,
रविकिरणांनो, शशिकिरणांनो,
सांगा सांगा जनकसुतेचा, मार्ग कुठे जाई ?

ये ये सीते अज्ञातातुन,
येइ जानकी अगम्यतेतुन,
सर्वस्वाचा विलाप ऐकुन, साद आता देई !

( काळाचा महिमा अगाध आहे. दैव देते आणि कर्म नेते. वनवासाचे सुखसुध्दा बिचाऱ्या सीतेच्या नशिबात नव्हते. दुष्ट नराधम रावणाने तिला लंकेत आणले, आणि अशोकवनात ठेवले. तिच्या दिव्य अलौकिक रूपलावण्याचा मोह अनावर झाल्यामुळे कामांध रावण तिची कसोटी पाहू लागला. साम, दाम, दंड, भेद या सर्व उपायांनी रावणाने सीतेचे मन वळविण्याचा प्रयत्न सुरू केला. रोज नित्य-नियमाने रावण तिच्याकडे येई आणि तिला कटुगोड भाषेत विचारी, " हे चारुगात्री, हे रूपसुंदरी--सीते..... ")

# उन्मत्त लंकाधीश

झणि दे मज होकार, जानकी, झणी दे मज होकार।
सम्राटाच्या मनोरथांचा करू नको धिक्कार ।

गौरवर्ण ही यौवनकांती,
रूपवती तूं उभी एकांती,
तुला पाहता नसानसातुन फुलतो मदनांगार !

त्रैलोक्यावर माझी सत्ता,
मी देवांचा भाग्यविधाता,
प्रचंड माझ्या सामर्थ्यावर गाजवि तूं अधिकार !

मला लालसा सुखभोगांची,
पट्टराणि तूं मम हृदयाची,
रंगमहाली नित्य घडावा, तुझ्यासवे शृंगार !

नाथ तुझा तो अनाथ होउन,
असेल हिंडत दाहिदिशातुन,
बांदिवान तूं माझ्या हाती, कोण तुला आधार !

समज विनंती अथवा आज्ञा,
बलदंडाची ऐक प्रतिज्ञा,
प्राप्तीसाठीं तुझ्या सुंदरी, उडेल हा:हा:कार !

( 'बिचारी सीता ! मुकाटपणे ऐकून घेत होती. रावणाचे शब्द विषारी नागाप्रमाणे फूत्कार करीत होते. विंचवाप्रमाणे डंख मारीत होते. त्या वेदना मरणाहून भयंकर होत्या. तिच्या काळजाचे पाणी पाणी झाले, दुष्ट रावणाचा संताप आला. यावेळी माझे नाथ इथे असते तर? तिला विरहवेदना असह्य झाल्या. काय करावे ? तिला काही सुचेना! बेचैन झाली ती ! राक्षसींच्या सक्त पहाऱ्यात जखडलेली ती बंदिनी सीता म्लान मुखाने आणि खिन्न मनाने बसली. डोक्यात विचारांचे आणि मनात भावनांचे वादळ सुरू झाले. आणि अचानकपणे तिच्या कोंडलेल्या भावनांचा बांध फुटला. दुःखावेगाने अति व्याकुळ होऊन ती म्हणाली, " हे रघुनायका, कां हा असा अन्याय ? कुण्या जन्मात किती पाप केले होते मी ? नाथ, कुणाला सांगू या माझ्या यमयातना ? " )

# विरहिणी सीता

क्रमांक ... वि: ... नों दि: ...

अशोकवनि या, सीतेचा कां, मांडियेला उच्छाद,
राघवा, काय असे अपराध ?

सहज मनाला आस लागली,
मृगाजिनाची ल्यावी चोळी,
मृगयेसाठी तुम्हा धाडिले, घडला काय प्रमाद ?

फूल मागता मिळती काटे,
धर्म शोधिता अधर्म भेटे,
पूर लोचनी माझ्या दाटे, घालु कसा मी बांध ?

तिकडे काया, इकडे छाया,
धाव घेउनी या रघुराया,
या हाकेचा दिशादिशातुन, उठेल का पडसाद ?

दुष्ट नराधम छळितो मजला
टाकित फासे क्षणाक्षणाला,
कामातुर या लंकापतिचा, चढलासे उन्माद ?

आत्म्यावाचुन देहविदेही,
तशीच झुरते मी वैदेही,
काळपुरुष हा खेळ खेळतो, महिमा हाच अगाध ।

(इकडे राम लक्ष्मण सीतामाईंचा शोध करीत रानोमाळ फिरत होते.वाटेत त्यांना जटायूने सर्व हकिकत सांगितली,रावण सीतामाईंना घेऊन चालला असताना त्याच्याशी लढल्यामुळे तो मरणोन्मुख झाला होता. रामांनी त्याला पावन करताच त्याने आपला प्राण सोडला. त्याच्या सांगण्याप्रमाणे शोध करीत राम लक्ष्मण उत्तरेकडून दक्षिणेकडे निघाले. वाटेत वाली सुग्रीवाचे राज्य लागले. वालीचा वध करून रामांनी सुग्रीवाला राज्यावर बसविले. त्याचाच सेनापती हनुमान हा रामाचा सेवक बनला. त्याने तर सीतेचा शोध करण्याचा विडाच उचलला आणि उड्डाण करून तो आकाशपंथाने निघाला..... )

वज्रहनुमान हा, रूप विक्राळ घे,
दंड झेपावुनी आज का ठाकला ?
घेइ उड्डाण, हा हा पहा चालला !

फोडि घनगर्जना, भेदिले अंबरा,
लंघुनी सागरा, जाय लंकापुरा,
ढवळुनी दशदिशी उठविले वादळा !

शोधिल्या गिरिगुहा, मंदिरे शोधिली,
जाउनीया वनी, जानकी पाहिली,
मुद्रिका देउनी वंदिले पाउला !

राजप्रासादि तो पोचला भीतरी,
दुष्ट त्या रावणे मांडिली मस्करी,
देत आव्हान तो वीर हुंकारला !

पाहि लंकापती, लोकही पाहता,
पकडुनी त्याजला, वस्त्र गुंडाळिता,
शेपटी पेटली, क्रोधहि पेटला !

धूर ज्वाळासवे जाळि लंकापुरी,
शांत झाला कपी, येउनी सागरी,
पाहुनी मागुती, खदखदा हासला !

( रुद्ररूप बलभीमाने सीतेचा शोध केला आणि लंकादहन केले. गिरिशिखरांचे मर्दन करीत हा वज्रहनुमान पवनवेगाने परत आला. रावणाने युद्धाचे आव्हान स्वीकारल्याची वार्ता ऐकताच सर्व वानरसेनेचा आनंद गगनात मावेना. राम-लक्ष्मणाच्या मागे वानरसेना उभी राहिली. सर्वांचे रक्त सळसळू लागले. वीरवृत्तीने सारेजण बेहोष होऊन नाचू लागले. सेनापती हनुमंताला श्रीरामांनी आज्ञा दिली. रामनामाच्या सामर्थ्यावर बलभीमाने सेतू बांधला. भव्य अशा जलसागरावरून रामचंद्रांचा सेनासागर चालू लागला. रणभेरी गर्जू लागल्या. नौबती झडू लागल्या. युद्धाला तोंड लागले.... )

# रामरावण युद्ध

वानरसेना लंघुन आली भव्य सेतुबंध,
राम-रावणाचे चालले घोरांदर युद्ध !
जय जय रघुवीर समर्थ !

प्रचंड शस्त्रे, प्रचंड अस्त्रे, वारावर वार,
रुद्ररूप हे कल्पांताचे, अखंड संहार,
प्रेतांचे जणु पडले पर्वत, कितीक बेशुद्ध !

ठिकऱ्या उडती देहांच्या अन् रक्ताचे पाट,
दिशादिशातुन लाल उसळले मातीचे लोट,
रणदेवीने इथे मांडला, भीषण नरमेध !

अफाट मागे सेनासागर रावण सरसावला,
बाणामागुन बाण सोडितो, रामचंद्र सावळा,
परस्परावर तुटुनी पडती, होउनिया क्रुद्ध !

वेध घेउनी श्रीरामांनी दिव्य बाण सोडिला,
रामबाण तो भेदुनि गेला रावण हृदयाला,
पुण्यात्म्याने पापात्म्याचा केला विच्छेद !

मदांध हत्तीपरी कोसळे रावण धरणीवरी,
वानरसेना श्रीरामांचा जयजयकार करी,
दळभारासह परत चालले राम स्वयंसिद्ध !

( अखेर सत्याचाच विजय झाला. दुष्टांचे निर्दालन आणि सज्जनांचे परिपालन हेच तर दैवी पुरुषांचे ब्रीद ! रावणाच्या रूपाने जगातील दुष्ट प्रवृत्तींचा विनाश झाला. सर्वांना आनंदी आनंद झाला. आपल्या पतीला आपल्या पावित्र्याची प्रचीति यावी म्हणून सीतेने अग्निदिव्य करण्याचे ठरविले. मी माझ्या पतीपासून - परमेश्वरापासून दूर, परपुरुषाच्या - राक्षसाच्या कैदेत राहिले, पण शीलवती राहिले. पावित्र्याची ठेव जतन केली. आजवरच्या पातिव्रत्याला साक्षी ठेवून आणि शीलसामर्थ्याला आवाहन करून देवी सीतामाई अग्निचितेवर उभी राहिली. हात जोडले, डोळे मिटले आणि श्रीरामांचे स्मरण करीत तिने अग्निदेवतेला विनंती केली.....)

अनुक्रम क्रमांक आशीर्वाद्य १००७० विः ...... ९८०२ ...... नों विः

हात जोडिते पदर पसरिते,अग्निदेवते राखी लाज,
जानकी,पावन होइल आज!

ध्यानमग्न मी उभी चितेवर,
सत्त्वपरीक्षा घेती रघुवर,
या वेडीवर प्रसन्न होउन, पुरवि मनींचे काज !

पहा पेटली आग सभोती,
नाम प्रभूचे जपते ओठीं,
हृदयीं माझ्या पावित्र्याची, ठेव असे निर्व्याज !

या ज्वाळांचे रूप घेउनी,
कुरवाळी मज माझी जननी,
नगरजनांसह गहिवरलेले,दिसती मज रघुराज !

थरारलीं जणु झाडे वेली,
चराचराची होत काहिली,
कानिं तुझ्या या कल्लोळातुन,येइल का आवाज ?

तुजसाठीं मी जळता जळता,
बावनकशि हे सोने उरता,
चढविन कंठी तुझ्या राघवा,त्या सोन्याचा साज !

( सीता पवित्र आहे याची सर्वांना खात्री पटली. सीता लक्ष्मण, हनुमंत आणि सर्व सेनेस घेऊन राम आपल्या अयोध्या नगरीत आले. अवघ्या अयोध्येला आनंद झाला. नगरजन आनंदाने नाचू लागले. भरताने ज्या पादुकांच्या नांवाने राज्य केले त्या पादुकांची दिव्य पावले आज अयोध्येला लागली. घरोघरी गुढयातोरणे उभारली गेली. रामनामाच्या पताका फडफडू लागल्या. रामविजयाचा डंका वाजू लागला. प्रजाजन बेहोष झाले. राजप्रासाद जणु जिवंत झाला. दाहि-दिशात चैतन्य नाचू लागले. नगरात वार्ता पसरली. आता रामाला राज्याभिषेक होणार ! आता रामराज्य येणार.....)

# राज्याभिषेक

आता फिरेल द्वाही, दाही दिशादिशाला,
घननीळ राघवाला, राज्याभिषेक झाला !

मातांस पुत्र भेटे, भरतास राम पाहे,
आनंद अंतरीचा, डोळे भरून वाहे,
संवेदना सुखाची भारावल्या मनाला !

सुख भोगुनी वनांत, त्या एकुलेपणाचे,
राही उभे समोरी, ते रूप लक्ष्मणाचे,
पाहून उर्मिलेच्या देहात प्राण आला !

मुनिराज दिव्य आले, गुरुदेव भक्त आले,
गंधर्व यक्ष आले, देवाधिदेव आले,
त्रैलोक्य आज येथें, आले पहावयाला !

कुणी तोरणे उभारी, कोणी गुढया उभारी,
संकीर्तनात दंग, पुरुषार्थ आज चारी,
आनंद या धरेला, आनंद या नभाला !

अभिषेक ऋत्विजांनी, केला म्हणोनि मंत्र,
सिंहासनी प्रसन्न, आरूढ रामचंद्र,
संस्कार हे घडावे, ब्रह्मांड नायकाला !

( रामाला राज्याभिषेक झाला. राम राजा झाला. भूतलावर एकदा रामराज्य आले. घरोघरी आनंदोत्सव साजरा झाला. राम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न आणि सेवक मारुती अशा या राम पंचायतनाकडे बघताना अयोध्येच्या डोळ्यांचे पारणे फिटले ! पृथ्वीवर जणु स्वर्ग उतरला, पण विधिघटना काही वेगळीच होती. नगरातील कोणा एका रजकाने पत्नीचा संशय घेऊन तिला घराबाहेर काढले. आणि " परपुरुषाकडे राहिलेल्या सीतेला रामाने स्वीकारले तरी मी तुला स्वीकारणार नाही. " असे म्हणून रामाची निर्भत्सना केली. दूताने ही वार्ता श्रीरामांना सांगितली. झाले. प्रजेचा कौल ! रामाने लक्ष्मणास आज्ञा दिली- " जा, सीतेला वनांत सोडून ये. " रथ सज्ज झाला. आणि मग..... )

# सीतात्याग

प्रजादक्ष या श्रीरामाने प्रजाजनाकरिता,
त्यागिली, गर्भवती सीता !

सवे चालला अबोल लक्ष्मण,
भरले अंतर, भरले लोचन,
प्रेमरूप त्या देवीपुढती नम्र करीं माथा !

त्या वेडीला जाणिव कसली,
मनी जानकी लाजुन हंसली,
डोहाळ्याचे पूर्ण मनोरथ, होतिल का आता ?

प्रजाजनाचा कौल मिळाला,
शासन का हे पतिव्रतेला,
भूमीवरती दुःखी कां ही, भूमीची दुहिता ?

विविध कल्पना येती जाती,
वनशोभेवर खिळली दृष्टी,
लज्जांकित ही भोळिभाबडी स्मरते रघुनाथा !

थांबवुनी रथ त्या कांतारीं,
लक्ष्मण फिरला तो माघारीं,
त्रैलोक्याची सम्राज्ञी का भोगी विरहव्यथा !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १४७८२

( त्यागमयी सीतेचा पुनः वनवास सुरू झाला. ऋषिराज वाल्मिकींनी तिला आपल्या आश्रमात आश्रय दिला. ही अयोध्येची महाराणी नाथ असून अनाथ झाली. राजमंदिरात विहार करणारी ही चारुगात्री सीतादेवी पर्णकुटीच्या छायेत बसली. प्रासादातल्या चतुर ललनांकडून चिडवून घेणारी ही गर्भवती कांता निर्जन अरण्यात डोहाळ्याचे मोहाळे पुरवून घेत काळ घालवू लागली. काही दिवसानंतर त्या वीरप्रसू सम्राज्ञीने जुळ्या बालकांना जन्म दिला. लव आणि कुश. एका कल्पलतेची दोन फुलेच ! सुंदर ! तेजस्वी ! बाणेदार आणि पराक्रमी ! वाल्मिकींनी त्यांना युद्धविद्या शिकविली, रामकथा शिकविली. या बालकांची बाललीला सुरू झाली. वनाचे राज्य राजपुत्रांनी सुरू केले ! कसे चालले हे राज्य.......)

# लवकुश

आश्रमी खेळती, लवकुश दोन्ही बाळें,
युवराजपदाने राज्य वनीचे चाले !

प्रासाद कुटीचा, सिंहासन दगडाचे,
हे राजवसन कीं, बल्कल कटिबंधाचे,
पायात शोभती रानफुलांचे वाळे !

हा आम्रफळांचा न ज रा णा दे वृक्ष,
माथ्यावर वेली, फु ले उधळिती लक्ष,
करि विंझण वारा, मुजरा देत लव्हाळे !

झाडावर जमला जणु पक्ष्यांचा मेळा,
ही हरिणशावके, करिती तृणाशी चाळा,
मारीत उडया हे, कळप मृगांचे आले !

कधि धरूनी हाती, चाप बाण ते सिद्ध,
शरवेध घेउनी करिती सावज विद्ध,
वाल्मिकी मुनींचे हृदय सुखाने न्हाले !

गुणगुणती गाती, कधी छेडिती वीणा,
मनि रामकथेचा, लागे छंद दिवाणा,
जानकी सतीचे कृतार्थ जीवन झाले !

( लवकुश मोठे होऊ लागले. वनातील पशुपक्ष्यावर माया करू लागले. स्वछंदपणाने वनविहार करू लागले पण वाल्मिकी मुनींनी शिकविलेली शस्त्रविद्या आणि अस्त्रविद्या अजमावण्याची संधी त्यांना मिळेना. एके दिवशी लवकुश वनात खेळत होते. इतक्यांत तिकडून येत असलेला एक अश्वराज—एक देखणा आणि शृंगारलेला घोडा त्यांना दिसला. त्या बालकांना कुतुहल वाटले. त्यांनी तो घोडा धरून - पकडून बांधून ठेवला. इतक्यात तिकडून अफाट सेना येताना दिसली. ते सैन्य श्रीरामांचे होते. अश्वमेध यज्ञाचा घोडा ज्यांनी पकडला त्यांच्याशी युद्ध करण्यासाठी ते आले होते. कोणी कोणास ओळखेना. पितापुत्रांची लढाई सुरू झालीं. पुत्रांनी जिंकले. पिता हरला. आश्चर्याने राम रथांतून खाली उतरले आणि त्यांनी त्या चिमण्या बालवीरांना विचारले.... )

अनुक्रम ४००८० दि: ... वांदो
क्रमांक ... १६८२ नों दि: २८.१२.६

# पितापुत्र

कोण आपुली, तात माउली, कथन करा राजकुमारांनो,
कोण तुम्ही, कोण तुम्ही, राजसबाळांनो ?

तुम्हा कोणती सुंदर देऊ उपमा,
पराक्रमाची जणू सुमंगल प्रतिमा,
क्षात्रतेज आगळे, रोमरोमि सळसळे-
बालरूप महन्मंगलांनो !

चिमणरूप हे निर्भय गोजिरवाणे,
मुखावरी विलसत ही राजलक्षणे,
सूर्यकुलातून की, दीपकळ्या जन्मती-
कल्पतरूच्या जुळ्या फुलांनो !

ही प्रसन्न वनराई भोवती फुले,
हा प्रसन्न गंधवात धुंद दर्वळे,
भुलुनि आज या वनी, क्रीडता सुखे कुणी-
स्वर्णमृगीच्या गुणी पिलांनो !

या कुटीत कोण बैसले तपोनिधी,
वीरप्रसू कोण आत बैसली सती,
शब्द ये मुखातुनी, अमृतात न्हाउनी-
मानवीस्वरूप कोकिळांनो !

मूर्तिमंत वत्सलते पाहुनी तुला,
जागतसे प्रे म भा व अंतरातला,
चापबाण फेकिले, वैर आज संपले-
जवळ या खुशाल प्रेमळांनो !

( श्रीरामांचा प्रश्न ऐकताच त्यांनी रामांना आश्रमाकडे नेले व सांगितले - ही पहा आमची आई ! आणि हे पहा आमचे गुरुदेव ! राम आणि सीता ! दृष्टिभेट झाली. सीतेने रामांना पाहिले मात्र, तिच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागल्या. रामहि सद्गदित झाले. अरेरे ! या राजपत्नीवर, या वीर मातेवर काय घोर प्रसंग आणला मी ! सम्राटपदाला पोचलेलो मी... आणि हे माझे युवराज...! अनाथ... परदेशी होऊन वनात फिरताहेत. अरेरे ! जानकी ! मी तुझा सहस्र अपराधी आहे ! मला क्षमा कर. तुझ्या महानतेपुढे मी विनम्र आहे. तूं देवत आहेस ग, तूं देवता आहेस..... )

# भेट

देवते ! देवते ! काय वाहू तुला ?
दर्शनाने तुझ्या, भरून आला गळा !

जाउनीया वनी, वचन मी पाळिले,
संगतीने तुझ्या, दुःखही हासले,
शिंपिला तूं तिथे, अमृताचा मळा !

त्यागुनी जानकी, सुखविली मी प्रजा.
विरह दावानली, भोगिली मी सजा,
राम सीतेविना, होय वेडा खुळा !

दूर लंकेस त्या, होउनी बंदिनी,
पूजिले तूं मला, माझिया चिंतनी,
शीलसंरक्षणा, सोशिले तूं छळा !

आश्रमी राहुनी, दोन बाळासवे,
गुंफिले हार तूं, गाळुनी आसवे,
मूक प्राण्यासही, लाविला तूं लळा !

पूर्ण अपराधि मी, काय मागू क्षमा,
आज उपमा नसे, दिव्य या संगमा,
जन्मजन्मातले, भाग्य आले फळा !

( किती दिव्य अलौकिक प्रसंग हा ! पितापुत्रांची भेट ! पतिपत्नीची भेट ! जणु जिवाशिवाचीच भेट ! बिचाऱ्या लवकुशांना कळून चुकले की हा आपला पिता ! ती भाबडी बालकें मातापित्याकडे पाहू लागली ! त्यांच्या डोळयांत पाणी उभे राहिले. ती हुंदके देत रडू लागली... आणि सभोवार उभे असलेले प्रजाजन ! त्याना तर हे दृश्यच पहावेना. सर्वांनी आपले मुख खाली वळविले. ज्या प्रजाजनांसाठी रामांनी सीतेचा त्याग केला होता त्याच प्रजेला साक्षी ठेवून राम सीतेला म्हणाले, " कांते, आज आपला दुःखभोग सरला. आज सोन्याचा दिवस उगवला. त्यागमूर्ति सीते, चल ! अवघी अयोध्यानगरी तुझी मार्ग-प्रतिक्षा करीत आहे. " पण....पण जन्मापासून जिने दुःखाचीच सोबत केली त्या विश्वमाउली सीतामाईने आपल्या मातेला कळवळून हाक मारली कीं, " आई ऽऽ ! आई मला जवळ घे. माते मला कुशीत घे ! "....)

# भूमिप्रवेश

गळे फूल वेलीवरचे, कसे हे अकाली,
भूमिरूप होती सीता, भूमिरूप झाली !

सती जानकीने केली, भूमिला विनंती,
'ठाव देई माते मजला, आज तुझ्या पोटी.'
स्मृती आज माहेराची, कन्यकेस आली !

दुभंगली धरणीमाता, कणव येउनीया,
एक दिव्य सिंहासन ये, जानकीस न्याया,
मायलेकिची ही भेट, अमृतात न्हाली !

सभोवार वंदन केले, घेतला निरोप,
अष्टभावनांचा येथें, होय जणू लोप,
हळू हळू सिंहासन ते जाय खालिखाली !

भेट आणि ताटातूटी, एका ठिकाणी,
एक सुखी संसाराची, संपली कहाणी,
गगन आज धरणीसाठी, अश्रु दोन ढाळी !

इथे आज देवत्वाची, लागली कसोटी,
इथे मानवाची शक्ती, ठरे आज खोटी,
कृपावंत परमेशाची; योजना निराळी !

ठाणे ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नोंद दि: ...

जगदीश खेबूडकर

यांची

आगामी

प्रकाशनें

●

**एकतारी**

( निवडक भावगीते )

●

**पर्णगुंफा**

( निवडक कविता )

●

**सोळावं वरीस धोक्याचं**


( निवडक लावण्या )

REFBK-0014792

REFBK-0014792

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

१४७८२



जगदीश खेबूडकर ☆ सुधीर फडके